## <u>प्रेसनोट दि. २३/०७/२०१९</u>

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

## कम्युनिटी पोलीसींग अनुषंगाने सिंहगडरोड पोलीस काकांनी चंद्रकांत दांगट पाटील शाळेला भेट देवुन विदयार्थ्यांना केले मार्गदर्शन

---

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात कार्यान्वीत असलेल्या ॲप/योजनांची माहीती देणेसाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीस स्टेशन हद्दीतील चंद्रकांत यशवंत दांगट पाटील शिक्षण व क्रीडा मंडळ संचलित शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविदयालय या ठिकाणी दि. २०/०७/२०१९ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी.व्ही.पवार यांच्या सुचना व मार्गदर्शनुसार सिंहगडरोड पोलीस स्टेशनचे पोलीस काका सहा.पोलीस फौजदार राजेंद्र सुर्वे, सहा.पोलीस फौजदार प्रल्हाद कडु व पोना १९०७ शैलेश सातव यांनी शाळेला भेट दिली. सदर भेटी दरम्यान उपस्थित विदयार्थी व विदयार्थीनी यांच्या अडचणी समजुन घेवुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. सदर वेळी पोलीस काका संकल्पना, महिला, मुली यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन अत्याचाराबाबतचे गुन्हे, अंमली पदार्थ, व्यसने, छेडछाडी संदर्भात, रॅगिंग, वाहतुकीचे नियम व हेल्मेट वापराबाबत माहीती सांगण्यात आली तसेच महिला व मुलींना छेडछाड, रॅगिंग संदर्भात काही अडचण आल्यास १०० नंबर वर कॉल केल्यास ५ ते १० मिनीटात दामिणी पथक, बिट मार्शल, पोलीस काका हे उपलब्ध होतात याबाबत तसेच आरोग्याविषयी योग्य ती काळजी घेणेबाबत मार्गदर्शन केले.

